# संजय घोडावत प्रायव्हेट पायलट परीक्षा उत्तीर्ण

- अमेरिकेत होणार ट्रेनिंग
- स्वतःचे हेलिकॉप्टर चालविणारे भारतातील तिसरे पायलट

**कोल्हापूर : प्रतिनिधी**



संजय घोडावत ग्रुपचे चेअरमन संजय घोडावत लवकरच पायलट होणार आहेत. ते प्रायव्हेट पायलट परीक्षा उत्तीर्ण झाले आहेत. त्यानंतर त्यांचे पायलट ट्रेनिंग अमेरिकेतील फ्लायिंग स्कूलमध्ये होणार आहे. ट्रेनिंग संपल्यानंतर त्यांना इंटरनॅशनल प्रायव्हेट पायलट लायसन्स मिळणार असून स्वतःचे हेलिकॉप्टर चालविणारे संजय घोडावत हे भारतातील तिसऱ्या क्रमांकाचे पायलट म्हणून ओळखले जाणार आहेत.

संजय घोडावत यांनी औद्योगिक क्षेत्रामध्ये तब्बल ३० वर्षे विविध कंपन्यांचे नेतृत्व करून एक टॉप उद्योगपतींची भूमिका पार पाडली आहे. ते स्वतः मेकॅनिकल इंजिनिअर आहेत. उद्योग व शिक्षण क्षेत्रात त्यांनी उभारी घेऊन प्रचंड नावलौकिक मिळवला आहे. त्यांनी जवळपास ७००० हून अधिक कामगारांना रोजगार पुरविला असून ११००० हून जास्त विद्यार्थ्यांना शिक्षण संस्थांच्या माध्यमातून शिक्षण देण्याचे काम सुरू आहे. त्यांनी अल्पावधीत शिक्षण व औद्योगिक क्षेत्रांत गरुडझेप घेतलेली आहे.

संजय घोडावत ग्रुपच्या माध्यमातून त्यांनी घोडावत एन्टरप्रायझेस प्रा.लि. ही हवाई वाहतूक कंपनीची उभारणी केली. आज या कंपनीकडे स्वतःची दोन हेलिकॉप्टर्स असून भविष्यात ते ई सी १३५ व ई आर जे १३५ ही दोन विमाने घेण्याची योजना आहे.